साधना - उपासना -
यासाठी पायाभरणी -

जन्मोजन्मी आत्म्यावर उमटलेले संस्कार व इहजन्मी प्राप्त देहांत आईवडिलांपासून संक्रमित सहजप्रवृत्ती म्हणजे मानवी जीवन होय. आत्मोन्नतीसाठी साधनेची आवश्यकता असते. प्राप्त परिस्थितीस अनुरूप होण्यासाठी धर्मानुसार उपासनेची गरज आहे. उपासनेमुळे [illegible] येते. जन्मोजन्मीचे संस्कार आत्म्याला साधनेकडे खेचतात. गूढविद्या - गूढ रहस्ये - अनाकलनीय अनुत्तरीत प्रश्न त्याला खुणावू लागतात. साधना धर्मातील आहे.

मानवी जीवनांत व्यक्तिमत्वाला महत्व आहे. मानवी जीवन क्रियमाणांतून साकारते. मानवाच्या कारणदेहांत जन्मोजन्मीचे सूक्ष्म संस्कार कोरलेले असतात. अनुकूल संधी प्राप्त होताच संस्कारांचे अंकुरीकरण होते. अंकुरीकरणांतून व्यक्तिमत्व साकारते. व्यक्तिमत्व विकासांत क्रियमाणाने भर पडते तर क्रियमाणयुक्त संस्कार बदलता येतात. यासाठी सत्संग, सद्ग्रंथांचे वाचन इ. गोष्टी आवश्यक आहेत. या प्राथमिक प्रवचनांतून मी सत्संग व्यक्तिमत्वाचा बाह्य विकास इ. गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे. सद्ग्रंथांचे वाचन हा हेतु मनांत ठेवून शिष्यपरिवाराकडून संतचरित्र पारायण, मनन इ. गोष्टी आयोजिल्या जातात. उपासनेतील आराधना, स्पंदनलहरी व्यक्ती गेयता, टाळ्या इ. क्रियांतून आईवडिलांकडून संक्रमित सहजप्रवृत्ती बदलता येतात. या बदलासाठी सहजयोगसाधना उपयुक्त ठरते. तुम्ही जन्माला येतांना सोबत जन्म घेते म्हणून सहज, योग संबोधण्याचे कारण संस्कारित पूर्व चढविलेल्या आत्म्या आत्म्यासोबत म्हणून योग. आत्मोन्नतीसाठी आत्म्यासोबत जन्मलेली सहजयोगीत साधनेचा वापर केला पाहीजे.

मानवी भौतिकशरीर व त्यांतून आकार घेणारे भौतिक जीवन याला सहजप्रवृत्तींचा आधार आहे. भौतिकशरीर पंचमहाभूतांचे आहे. या भौतिकशरीराशी संलग्न पंचकोषांचे शरीर आहे. पंचकोषात्मक शरीरावर आघात, बदल आवश्यक आहेत.

हे आघात कुठे ध्यानपूर्वक उपासनेच्या मार्गाने तदनंतर आराधनेच्या मानसपूजा मार्गाने कुठे लावतात. पंचकोषांतर्गत सूक्ष्मशरीर बदलण्याची प्रक्रिया कारणदेहांत बदल घडवेल. इथे साधनेचा प्रांत सुरू होतो.

साधनेच्या प्रांतात प्रवेश केल्यानंतर सुखदुःखाचे भान, जन्मभर जाळणारी चिंता या गोष्टी उरत नाहीत. आत्मोन्नतीमधील अडथळ्यांची किनारे नसल्यामुळे आत्मा मुक्तप्रवृत्तीनुसार विकासाकडे झेपावतो. आत्म्याचा ऊर्ध्वविकास हा व्यक्तिमत्वाचा इहजन्मी पुढील जन्मी परमोच्च विकास होय.

पुन्हा केव्हांतरी साधनेच्या अंगणांत प्रवचनाद्वारे भेटू.

# माझी परमार्थाची वाटचाल (१)

## MEMORANDA

सिंहावलोकन करतांना लक्षांत येते कि माझ्यासारखा एक सामान्य कुटुंबातील सामान्य माणूस, सद्गुरुकृपेने पारमार्थिक वाटचालीत मैलाचा दगड गाठू शकला. १९३३ साली गोळवण गावात तालुका मालवण जि. रत्नागिरी आताचा सिंधुदुर्ग येथे माझा जन्म झाला. अद्याप घर शाबूत आहे. घर म्हणण्यापेक्षा पूर्वजांच्या गोष्टी सांगणे योग्य होईल. वाडीला निसर्गाचे वरदान आहे. तिन्ही बाजूला डोंगर, गच्च झाडी एका डोंगरात नदीचा उगम होतो. गाव ओढ्यावर वाघाचा वावर नेहमी असतो. रणदुर्ग व गांव माझी सोबत प्रत्यक्ष आहे. माझ्या जन्मापूर्वी गावांत चौथी मराठी सातवीपर्यंत शाळा सुरू झाली होती. ब्राह्मणेतरांची मुले शिकू लागली. केवळ तरुण मराठी ७ वी पर्यंत शिक्षण घेऊन तलाठी, शिक्षक झाले. गांवात समजू लागल्यानंतर - भजनात गोडी वाटू लागली. माझा काका रामा दाजी भजन गात असत तो वारसा माझ्याकडे आला. गायन भजन आवडू लागले.

friday 26

गोळवण गांव मलेरिया पीडीत होते. मीसुध्दां पेशंट होतो. त्यामुळे गोळवण सोडून मोगरणेवाडी पेंडूर गांवी आजोळी माता जावें लागले. मोगरणे गांवी सुध्दां निसर्गाची लयलूट आहे. मोगरणे गांव तिन्ही बाजुनीं डोंगराच्या खळग्यांत वसले आहे. तिथे जाने, महिन्यांत सकाळी ८ वाजेपर्यंत उघडे वाडीत पडल नाहीत. उन्हाळ्यांत कुन्हाचा भासत नाही. पावसाळ्यांत पावसाशिवाय दिवस जात नाहीत.

saturday 27

वाडीच्या पुर्वदिशेला शिवकालीन वेताळगड आहे. तेथुचे धमधमे मोठी विहिर व्यापारी निरीक्षणाची सवडबंदी आहे. वेताळगड उंच आहे. आकाश निरभ्र असेल तर पश्चीमेला सरळ समुद्र दिसतो. मालवण बंदर १० किलोमीटर अंतरावर असून बंदर सिंधुदुर्ग किल्ला व मालवण कोळंबीच्या कोनुणांत उलाढ घेऊन जाणाऱ्या बोटी उसळून कुंपणीच्या बोटसुध्दां दिसत असत.

monday 29

मोगरे वाडीला लागूनच धामापूरचे प्रसिद्ध तळे आहे. साधारणतः ४ किलोमीटर परिघ या तलावाने व्यापला आहे. मोगऱ्यातील ओढ्याने हा तलाव भरला जातो. हा ओढा ४ किलोमीटर लांबीचा असून पावसाळ्यात ओलांडता येत नाही. मोगरणे मु॥ तुकाराम मास्तर, जगन्नाथ रेडकर, शिवराम गावकर इ. मंडळींच्या सान्निध्यात दशावतारी नाटके पहाणे, सहभागी होणे इ. आवडी निर्माण झाल्या. अभिनयाचे धडे या नाटकांनी दिले. उत्स्फूर्त वक्तृत्व या नाटकांमुळे प्राप्त झाले.

जीवनातील हजरजबाबीपणाचे tuesday 30

मूळ नाटकांमुळेच फुलले. जनसमुदायांसमोर उभे रहाण्यासाठी आवश्यक व्यासपीठ व्याडस या गावरान नाटकांनी दिले.

बालपणी मी तोतरा बोलत असे. "शिवाजी महाराजांनी म्यानातून त ऽऽऽ लवार उपसली" हे वाक्य म्हणताना त या अक्षराकडे आमची गाडी थांबत असे; ल अक्षर उच्चारेपर्यंत ल, ल, ला, असे घडे खाल्ल्यासारखे उच्चार करावा लागत असे.

मला असं वाटते, 'तलवार शब्द उच्चारेपर्यंत शत्रुपक्षीय सैनिक माझे मुंडके छाटील'. या तोतरेपणाची मुंबईत थट्टा होत असे परंतु गांवी थट्टा होत नसे. माझे आजोबा शंकर राघो, आजी पार्वती जयबाई यांनी माझा हा दोष जाईल अशी ग्वाही मला दिली. माझे आजोळचे आजोबा तापट, चिडखोर होते. त्यांची उंची ६ फूट होती. त्यांचा कोयता मला दोन्ही हातांनी उचलवत नसे. सामाजिक कार्यात ते अग्रेसर व दानशूर होते.

saturday

शाळा, मंदीर जिर्णोद्धार यांची आवड होती. माझी आजी एक आशेशील स्त्री होती परंतु रोगी होती. मला रिकामे बसू देत नसे. माणसाने नेहमी "कामात दंग असावे" या वाक्याचा उत्तरार्ध मराठे गुरुजींनी पूर्ण केला. मराठे गुरुजी म्हणत असत "माणसाने कामात किंवा नामात दंग असावे."

माझ्या आजीने मला भजनांत गायला भाग
पाडले. मला नवी उमेद दिली. जसे नाटकं
कुणाला आवडत असे तसे भजन आवडत असे.
किंबहुना गायन माझ्या आवडीचा विषय होता.
आजी माझ्या गायनावर फिदा होती. मला
गायनासाठी प्रोत्साहन देत असे. माझ्या आजीने
बालपणी माझ्यावर जो संस्कार केले त्यांमुळेच
मी घडलो असे मला वाटते. माझे आजोळ
धनधान्य फुलाफुलांनी व दिलदार मनाच्या
माणसांनी समृद्ध होते. मे महिन्याच्या सुट्टीत
३०/३५ माणसांनी गजबजलेले असे



माणसांवर माणसे आपटत असत. मला सख्खे
मामा नाहीत. माझे चुलत मामा सख्ख्यापेक्षा
सरस होते. चुलत वाटेल असे त्यांची वागणूक
नव्हती. किंबहुना मोगरणे गावातील माझे
सगळे चुलत मामा - चुलत नव्हतेच इतकी
जवळीक ~~असल्या स~~ माझी सर्व मामांशी
होती. माझे धाकटे मामा गावपुढारी होते.
गावात त्यांचा दरारा होता. नावाप्रमाणे
ते राजा होते.

माझ्या मामींपैकी मोठी मामी दामगोडे गांवातील ठाकूर घराण्यातील होती, श्रीमंत होती पण नंतर कुरीत असे. धाकटी मामी वांद्रेकडची परब घराण्यातील होती. गोरीपान, उंच निळसर डोळ्यांची माझ्या आजीची लाडकी सुबक सून होती परंतु मुलपणा नव्हता. या मामीने माझे सर्व लाड पुरवले कि स्वतःच्या मुलींच्यासुध्दा पुरवले नसतील. दोन्ही मामी, मामा यांच्या मायेच्या पंखाखाली माझे बालपण गेले.

माझा तोतरेपणा मराठे गुरुजींनी घालवला. मला उच्चाराची दिक्षा मराठे गुरुजींनी दिली. मराठे गुरुजी मोगरेवाडीतील



प्राथमिक शाळेत शिक्षक होते. संस्कृतचे गाढे पंडीत होते. सुश्रुताच्या ग्रंथांवर संस्कृतमध्ये टिका त्यांनी लिहिलेली आहे. टिळकांच्या चळवळीशी संबंध असल्यामुळे सरकारी नोकरी पत्करली नाही. एक शहरी जिवनापासून दूर असलेल्या आडमार्गातील खेड्यांतील जीवन त्यांनी पसंद केले. विद्यादानाला वाहून घेतले.

अशा त्या विद्वान माणसाचे व मोगरणेवाडीचे दुर्भाग्य समजले जाते. मोगरणेवाडीतील माणसे गुरुजींची विद्वत्ता समजू शकली नाहीत. मराठे गुरुजी शिक्षण देत होते परंतु माणसांची जवळीक साधली नाही. मराठे गुरुजी आयुर्वेद जाणत होते परंतु वनौषधींचे महत्त्व गावातील जनतेला पटत नव्हते.

माझ्या आजीचे व गुरुजींचे संबंध जिव्हाळ्याचे होते. माझ्या आजीने मला त्यांच्या ओळखीत टाकले. गुरुजींकडे मी बीजगणित शिकण्यासाठी जाऊ लागलो. बीजगणित, इंग्लिश व्याकरण. त्यांनी मला संस्कृतची गोडी लावली. ~~मूल~~ मूलपत्नीतारम द्वारे त्यांनी मला मराठी-संस्कृत नाते दाखवून दिले. मालवणी शब्दोच्चार संस्कृत भाव उच्चार आहेत ते दाखवून दिले. संस्कृत, गीत, स्तोत्रे, श्लोक सुभाषिते माझ्याकडून आवडीने पाठ करून घेतली. आज मी या सुभाषितांचा सढळपणे वापर करतो.

~~संस्कृत काव्यांच्या खजिन्यांचा दरवाजा मला~~
त्यांनी किलकिला ~~उघडून~~ करून दिला. मराठे गुरुजी
कोकणस्थ ब्राह्मण परंतु जातीय निर्बंध
त्यांनी तोडून टाकले. शिक्षणक्षेत्रांत जातीपातींत
भडकणारे ते कधीच नव्हते. सर्व जातीतील
एक विद्यार्थ्यांना त्यांनी समभावानें शिकवलें त्यांची
वागणूक सामाजिक क्षेत्रांतसुद्धा जातीय नव्हती
~~पंक्तीप्रपंच~~ त्यांनी कुठेंहि पाळल्याचं ऐकिवांत
आलेला नाही. त्यांची वागणूक निर्भय होती.



पिशाच्चें, भिकारी श्वापदें यांना
घाबरले नाहीत मला तेच शिक्षण त्यांनी
दिलें. पिशाच्च्यादि कल्पनांची ते हेटाळणी
करीत, बुवाबाजी भोंदुगीरी, कोंबडी बकऱ्यांचे
बलीदान यांच्यावर टीका करीत, परंतु
विठ्ठलद्वारें भागवत धर्म भक्तिमार्ग यांची
सांगड घालून सर्व देवळें हरिजनांसाठी,
त्यांचा भर असे.

"माझ्या वयाच्या १३/१४ वर्षापर्यंत मराठे गुरुजींनी माझ्यावर संस्कार केले. १९४० सालापर्यंत कोंकणात महाराष्ट्रांत भुतेखेते, करणी, उतारे देणे, जादूटोणा, अंगात येणे भगतगिरी याचे प्रस्थ जास्त होते, वाडीतील समाजजीवनात भुतेखेते हे अविभाज्य अंग होते. घराघरांत लोकं घुमत. ब्राह्मणाचे घरी उंबरे लोकं प्रश्न विचारीत. प्रश्नाचे स्वरूप असे "माझ्या घरांत कोणताही नाही, माझा बैल आजारी आहे देवाक काय सांग" "मुलीचे लग्न जमत नाही"

tuesday 20

असे प्रश्न विचारले जात. कोणाकडे बळी दे, कोंबड बळी दे, सोन्याचे नाणे दे अशी उत्तरे कुणाऱ्यांकडून दिली जात. जनता त्या आज्ञा पाळत असे. माझ्या बालमनावर मराठे गुरुजींमुळे हे संस्कार झाले नाहीत. आज मेस्त्रेवाडीत लोकांची एस.टी.ची गाडी धावते जग वेगाने पुढे सरकू लागले परंतु धार्मिक अंधश्रद्धा दूर झालेल्या नाहीत. त्याकाळातील सुधारणा ~~पुरेशा~~ नाहीत.